## नवोपक्रम

# वंचित मुलांसाठी पालामध्ये शाळा - अभ्यास वर्ग सुरू करून शिकवणे

**उपक्रमकर्ता बालरक्षक शिक्षक - श्यामराव नारायणराव रावले (माध्यमिक शिक्षक)**

**कै.दिनानाथ मंगेशकर माध्यमिक शाळा सातेफळ, ता. वसमत जिल्हा हिंगोली पिन: 431512**

**मोबाईल नंबर 9422111763 ई-मेल: shamrawale@gmail.com**

---

कोविड 19 मुळे सर्वच अस्तव्यस्त झाले यामध्ये शिक्षणही सुटले नाही. पालातील वस्तीत राहणारी मुलं शिक्षणापासून थोडे दूरच आहेत काही शाळेत दाखल आहेत तर काही दाखल नाही त्यांना मागील शैक्षणिक वर्षात व या सुरू शैक्षणिक वर्षात शाळेत दाखल केले आहे.पण शहरी भागातील शाळा आठवी ते बारावी पर्यंतचे वर्ग सुरू करण्यास मान्यता आहे. या वस्तीतील मुलं प्राथमिक वर्गातील अधिक आहेत त्यांच्या शिक्षणाची खरी समस्या निर्माण झाली होती. आम्ही 10 ऑक्टोबर 2021 ला या सर्व शिक्षणापासून वंचित मुला-मुलींना वह्या,पेन, पेन्सिल, उजळणी इत्यादी शालेय साहित्य वाटप केले पण त्यांच्या शिक्षणाचं काय ? हा विचार माझ्या मनात आला.आणि तेंव्हाच मी पालमध्ये शाळा-अभ्यास वर्ग सुरू केला.

नवोपक्रमाची गरज आणि महत्त्व :- आसेगाव रोड कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या च्या मागील पालातील वस्ती आहे.ही सर्व वस्ती कापडी पालातील असुन येथे 80 ते 100 घरे आहेत. या वस्तीत वैदू,नंदीवाले,गारोडी, डोंबारी खेळ करणारे, वडार, शिखलकरी, इतर मोल-मजुरी करणारे कुटुंबे आहेत. प्रथम दर्शनी या वस्तीत बरीच मुल-मुली आहेत हे माझ्या लक्ष्यात आले मी या वस्तीमध्ये माझे बालरक्षक ओळखपत्र गळ्यात घालुन गेलो. काही स्त्री-पुरुष वर्ग बोलायला च तयार नव्हता. उत्तरं मिळत होती सर,ही मुलं शिकत नाहीत, तुम्ही येऊ नका पण मी हार न मानता सतत संपर्क वस्तीतील पालक व मुलांसोबत ठेवला. परत-परत भेटच राहिलो. मागील वर्षी नोव्हेंबर-डिसेंबर 2020 काही मुलांना शाळेत प्रवेश दिला आणि यावर्शी जुलै -ऑगस्ट मध्ये काही मुलांना शाळेत दाखल केले. मनस्वी खुप आनंद झाला.कारण ही होत की मला या कामात यश भेटले. मी पुन्हा वस्तीत गेलो लक्षात आलं काही मुलं थोडी दिवस शाळेत गेली नव्हती पण काही मुलं जात नव्हती आता माझ्या समोर नवीन समस्या निर्माण झाली.आता करायचे काय ? 10 ऑक्टोबर ला माझ्याकडून सर्व मुलांना शालेय साहित्य वाटप करून प्रत्यक्ष शाळा-अभ्यास वर्ग सुरु केला.आता वस्तीत शाळा झाल्यामुळे मुलांना शिक्षणाची सोय झाली. या उपक्रमामुळे मुलांना आपल्या घराजवळच शिक्षण मिळू लागले आणि मुलं शिकू लागली व शिक्षणाच्या प्रवाहात येऊ लागली व आवड निर्माण झाली. या उपक्रमाचा जवळपास 35 ते 40 मुलांना आत्ता फायदा होत आहे.

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे: शिक्षणापासून वंचित मुलांच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून शिकविणे.**



दिलेल्या फोटोतील वंचित मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शाळेत दाखल करून व पालामध्येच शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिल्यामुळे शिक्षणाच्या प्रवाहात येण्यास मदत झाली आहे. या उपक्रमा पूर्वी वस्तीतील बरीच मुले वाटेल ते काम करायची जसे भंगार गोळा करणे, मेकॅनिक्स हाताखाली काम करणे, गवंडी सोबत काम करणे इत्यादी काम करत असत. काही मुले गाडीवर जायची.यातून मिळालेले पैसे आई-वडिलांना देतात तर काही स्वतःचा खाऊ घेऊन खातात.या सर्व त्यांच्या समस्या पाहिल्यामुळे माझ्या मनात विचार आला. त्यांच्या शिक्षणाचा काय ? त्यांना तर शिक्षणाच काही देणं घेणं नाही असं पाहायला मिळत होते. उपक्रम राबविला जात आहे त्या मधून जो फायदा होत आहे तू कोणत्या घटकांना ते पाहूया

**1) शाळाबाह्य मुलांचा शोध घेणे :** बालरक्षक ही संकल्पना सर्वात आधी जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम आदेश दिनांक 9 जानेवारी 2017 ला आली या आदेशानुसार माझी नियुक्ती राज्य बालरक्षक म्हणून झाली आणि माझे कार्यक्षेत्र वसमत तालुका आहे. मी सतत माझी नोकरी करत-करत तालुक्यामध्ये विविध शाळेमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे आणि अनियमित विद्यार्थ्यांना शाळेत नियमित केलेआहे याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणजे आसेगाव कॉर्नर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या मागे, वसमत येथे पालातील वस्ती आहे या वस्तीतील काही मुले वाटेल ते काम करतेवेळी व रस्त्यावर भंगार गोळा करतेवेळी आढळून आली विचारले असता काही मुलं म्हणाली आम्ही शाळेत आहे तर काही म्हणाली आम्ही शाळेत नाहीत हीच समस्या जाणून मी वस्तीत पोहोचलो तर नवीन समस्या निर्माण झाली पालक बोलायला तयारच नव्हती. पहिल्या दिवशी तर वापस झालो पण मनामध्ये जिद्द व विश्वास होता की आपण या वंचित, शिक्षणापासून दूर असलेल्या मुलांसाठी काहीतरी आपण केलं पाहिजे या हेतूने सतत संपर्कात गेलो आणि वस्तीत मुला मुलींना पालात शाळा सुरू करून शिक्षण देणे व शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे प्रयत्न अविरत सुरूच आहेत.

**2) शाळाबाह्य मुलांना होणारा फायदा :** शिक्षण काय आहे ? आपण शिकले पाहिजे या संकल्पनेपासून दूर असलेल्या सर्व मुला-मुलींना या उपक्रमामुळे निश्चितच फायदा होणार आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी मुलं वाटेल ते काम करायच ची आई-वडिलांसोबत कामाला जायची आणि आपलं पोट भरायचं हा त्यांचा दिनक्रम शिक्षण कसल आणि कुठे ? अशी अवस्था या ठिकाणी होती.काही मुलं कधी शाळेत गेली तर काही कधीच शाळेत गेली नाहीत.अशा सर्व मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणल्यामुळे नक्कीच फायदा होईल व जी मुलं शिक्षणापासून दूर होती ती आता शिकू लागतील, शिकत आहे या उपक्रमामुळे हळूहळू परिस्थिती बदललेली दिसत आहे.

**3) पालातच शाळा सुरू केली :** आता covid-19 मुळे व रुग्ण संख्या कमी असल्यामुळे प्राथमिक शाळा सुरू होतील या आशा निर्माण झाल्यामुळे मी वस्तीत गेलो, मुलांशी चर्चा केली. त्यांना शाळा शिकायची आहे असं त्यांचं मत होतं पण शालेय साहित्य नाही मग मी त्या सर्व विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्याचीची व्यवस्था केली व 10 ऑक्टोबर 2021 ला मा. श्री. तानाजीराव भोसले साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती वसमत, श्री

गुणाजी राव ढोरे सर, केंद्रप्रमुख श्री पी. एन.दातार साहेब,एम पी डब्ल्यू व मी स्वतः.आम्ही सर्वांनी वस्तीतील मुला-मुलींना वही, पेन, पेन्सिल, खोडरबर, उजळणी, खाऊ इत्यादी साहित्य शिक्षणापासून वंचित 54 मुलांना वाटप केले.



माननीय भोसले साहेब व सर्व मान्यवरांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप झाल्यानंतर ही समस्या निर्माण झाली.शालेय साहित्य वाटप केले आहे पण शिक्षणाचा काय ? covid-19 च्या निर्बंधांमुळे शहरी भागातील आठवी ते बारावी चे वर्ग सुरू आहेत पण प्राथमिक वर्ग सुरू झाली नाही. या सर्व मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात तर आणायचे होते मग मीच मा.भोसले साहेबांसमोर माझा विचार दर्शविला की मीच तीन ते साडेचार वस्तीवर येऊन शिकवू शकतो तर साहेबांनी या निर्णयाचं स्वागत केलं व पालावर शाळा अभ्यासवर्ग सुरु करायला तोंडी मान्यता दिली आणि आता मी दररोज माझी शाळा करून वस्तीवर जात आहे



***नवोक्रमाचे नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही:-**

या उपक्रमाचे नियोजन खालील प्रमाणे करण्यात आले

1) उपक्रम पूर्व स्थिती चे निरीक्षण:- मी शिक्षक असल्यामुळे प्रत्येक मूल शिकलं पाहिजे ही भावना मुळातच माझी आहे. 2018 मध्ये माझी बालरक्षक म्हणून नियुक्ती झाली आणि तेव्हापासून शिक्षण योग्य बालक दिसले, आढळले की मी विचारपुस करू लागलो, कुठे शाळेत आहेस कुठे नाही. अशीच मुलं मला भंगार गोळा करते वेळी दिसून आली आणि त्यांचा शोध घेतला.

**2) तज्ञांशी चर्चा :** मी सततच पंचायत समितीतील गटशिक्षणाधिकारी साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी साहेब, शिक्षण तज्ञ, राज्यस्तरावरील बालरक्षक यांच्याशी संवाद साधत होतो. मला जास्त मदत श्री तानाजी राव भोसले सर यांच्याशी संवाद साधला यामुळे झाली व मला या कार्याला मदत केली.

3) **आवश्यक साधनांचा विचार :** ही सर्व वस्ती ही पालात राहते. येथे राहणाऱ्या पालकांची स्थिती हर्ष अनुकूल नाही रोजच काम करायचे रोजच कमवायचे आणि मिळालेल्या रुपयांमध्ये आपला उदरनिर्वाह चालवायचा.आपल्या मुला-मुलींना शिकवायचे आहे पण मार्ग नाही यामुळेच त्या पालकांचं लक्ष मुलांच्या शिक्षणाकडे नाही त्यातच आर्थिक स्थिती बिकट हालाखीची आहे.सर्वांची इच्छा आहे की मुलं शिकली पाहिजे म्हणून मी आवश्यक साहित्य वाटप करून पालात शाळा त्याठिकाणी सुरू केली.

**4) करावयाच्या कृतींचा क्रम :** रोजच पालात शाळा सुरू झाल्यामुळे नवनवीन मुल येऊ लागली आवश्यक साहित्य मी रोज पुरवत होतो व दुपारी तीन ते साडेचार या वेळेमध्ये मुलांसोबत पालामध्ये सुरू केलेल्या शाळेत जाऊन प्राथमिक शिक्षण देत आहे.

**5) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :** 10 ऑक्टोबर 2021 पासून कोविड काळात पालामध्येच,त्यांच्या घरा शेजारीच शिक्षणाची सोय झाल्यामुळे मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाली आता मुलं शिकती लिहिती झाली.

**6) कार्यवाहीचे टप्पे :** रोजच वस्ती जात असल्यामुळे नवीन वस्तीत राहायला कोण आले व किती दिवस राहणार याची माहिती तात्काळ कळत आहे अशा सर्व मुलांना शाळेत प्रवेश देणे व पालावरील शाळेत जाऊन रोज अभ्यास घेणे व शिकविणे.

**7) उपक्रमासाठी इतरांची मदत :** या उपक्रमासाठी वस्तीतील पालकांची श्री शेषराव नक्कलवाड व मारुती नक्कलवाड, सलीम पठाण यांची मदत घेतली.तसेच शाळेत लागणारी चार्ट मी आणली तर बाराखडी, abcd चार्ट,अंकलेखन ही चार्ट श्री नामदेवराव दळवी सरांनी दिले.

**8) उपक्रमासाठी सादर करावयाची पुरावे :** प्रत्यक्ष वस्तीत पाला मध्येच शाळा वर्गाचे फोटो सोबत जोडत आहे.






**⁕ नवोपक्रमाची कार्यपद्धती:-**

**1) उपक्रम पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी :** रोडवर, रोडच्या काठेला फिरत असते वेळेस, भंगार गोळा करतेवेळी आढळलेल्या अशा मुलांचा शोध घेतला तो फोटो




**2) कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन :** वस्तीतील मुलांना आपल्या घराजवळ शाळा शिक्षणाची सोय झाल्यामुळे मुलं शाळेत येऊ लागली आहेत. आवश्यक शैक्षणिक साहित्य मिळत आहे.आता त्या वंचित मुलांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होत आहे हे पालातील शाळेचे यशच म्हणावे लागेल.

**3) कार्यवाही करताना आलेल्या अडचणी :** सुरुवातीला आमची मुले शिकत नाहीत असाच सूर वस्तीतील पालकांमधून येत होता पण माझ्या सतत संवादाने-संपर्काने वस्तीतील पालकांचा सहयोग मिळत गेला आता पालामध्ये शाळा सुरू झाल्यामुळे मुलं शिकत आहे याचाही त्यांना आनंद होत आहे. आता अडचण नाही.

**4) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व माहिती संकलन :** शाळाबाह्य मुलांचा शोध घेणे व शाळेत दाखल करणे हा उपक्रम सुरूच आहे. कोविड 19 च्या काळात शाळा सुरू करून शिक्षणाची गंगा वंचित मुलांपर्यंत पोहोचल्यामुळे वस्तीत शिक्षणाचे वातावरण तयार होत

आहे.आता पालातील शाळेत 35 मुलं-मुली नियमित शिकण्यासाठी येत आहेत हे माझ्या केलेल्या प्रामाणिक प्रयत्नाला यशच म्हणावे लागेल आणि हा उपक्रम अत्यंत यशस्वी होत आहे.

**5) माहितीचे विश्लेषण :** आपल्या घराजवळच पालामध्ये शाळा अभ्यास वर्ग सुरू झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाली आहे. आता नियमित शाळेत येत आहेत. दिलेलं काम आवडीने करत आहे. याच वस्तीमध्ये नवीन कुटुंब राहायला आले आता लगेच कळते. सर्व विविध जाती-धर्मातील, संप्रदायातील परिवार जसे एकत्र वास्तव्य करतात तसेच सर्व विद्यार्थी एकत्रितपणे या वर्गात बसतात, शिकतात व त्यांनाही आता शिकायचे आहे.

**नवोपक्रमाची यशस्विता/ फलनिष्पत्ती :** माझा मागील वर्षापासून वस्तीतील पालकांशी असलेला सततचा संपर्क यामुळेच मला वस्तीतील मुलांसाठी शाळा सुरू करून शिकविणे हा उपक्रम करता आला मला सहयोग मिळाला नसता तर नक्कीच वस्तीतील मुलं ही शिक्षणाच्या प्रवाहापासून वंचित राहिली असती शाळा सुरू झाल्यामुळे माझ्या केलेल्या प्रयत्नांना मिळालेले यशच म्हणावे लागेल.

**1) मुलं शिकती-लिहिती झाली :** वस्तीतील मुलांना केवळ शाळेत दाखल करून त्यांच्यासाठी वस्तीत शाळा सुरू केल्यामुळे वस्तीतील मुलांना-मुलींना याचा खूप फायदा होत आहे.आता मुलं लिहीत आहेत हे पाहून पालकांचाही सहयोग मिळत आहे.

**2) शिक्षणाची सोय झाल्यामुळे आवड निर्माण झाली :** वस्तीतील काही मुलांना शिक्षण काय आहे ते आत्ताच कळले तर काही विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्राथमिक धडे जसे स्वर, व्यंजन, बाराखडी अंकलेखन, इंग्रजी एबीसीडी, वाचन-लेखन हे कळायला लागले व या प्रयत्नांमुळे शिक्षण- शिकण्याची आवड निर्माण झाली.

**3) बालरक्षक-शिक्षकांना प्रेरणा :** 10 ते 14 वर्ष आणि आता 18 वर्षापर्यंत सर्वच बालक शिकली पाहिजेत शिक्षणाच्या प्रवाहात आली पाहिजेत हा एक जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाचा भाग आहे या उपक्रमामुळे राज्यातील सर्व बालरक्षक-शिक्षकांना नक्कीच वाटेल आपणही वाडीतील, तांड्यावरील, वस्तीतील शिक्षणापासून वंचित मुला-मुलींसाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळेल आणि आणि नियमित बालकांचा शोध घेण्याच्या चळवळीला बळ मिळेल शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी वेग येईल. यापूर्वीही शाळाबाह्य मुलांचा शोध घेण्याच्या कार्यक्रमाला लाभ झाला आहे.

*** समारोप :**

आसेगाव कॉर्नर, वसमत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या मागील वस्तीमध्ये मी शाळा-अभ्यासवर्ग सुरू केल्यामुळे रोजच वस्तीतील मुलांच्या संपर्कात राहता आले रोजची हालचाल कळत गेली. मुलांना शिकवण्याचे काम करत असल्यामुळे वस्तीतील मुलं आता शिकत आहेत, लिहीत आहेत.आता पालातील शाळेत रोज 35 मुलं -मुली शिकायला येतात व शिक्षणाचे प्राथमिक धडे घेतात या उपक्रमामुळे वस्तीमध्ये देखील शैक्षणिक वातावरण होण्यास सुरुवात झाली आहे कोविड काळात शाळा सुरू केल्यामुळेच,कोविड चे निर्बंध दूर झाल्यावर ही सर्व मुले प्राथमिक शाळेमध्ये जातील यात मला शंका नाही.

**⁕ पालातील शाळेला भेट देणारे अधिकारी व व्यक्ती:-**

10 ऑक्टोबर 2021 रोज रविवार ला वस्तीत शाळा सुरु करणे व शिकविणे हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीत आहे हे पाहून शिक्षण विभागातील उच्चपदस्थ अधिकारी यामध्ये श्री ससाणे साहेब गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वसमत तसेच ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री तानाजीराव भोसले साहेब,शिक्षणदूत श्री नामदेव दळवी सर, गट समन्वयक श्री लांडगू सर, केंद्रप्रमुख श्री गुणाजीराव ढोरे सर, श्री शहा सर, एम. पी. डब्ल्यू. कोरोना योद्धा श्री दातार साहेब, सामाजिक कार्यकर्ते श्री सुनील लालपोतू, श्री संजय सवंडकर,श्री बालाजी साळवे,श्री सुभाष गाढे मामा,श्री मयूर महाजन इत्यादी मान्यवरांनी या पालातील शाळेला भेट देऊन उपक्रमाची पाहणी केली ,माझे अभिनंदन ही केले व आवश्यक मदत करण्यात येईल असे सांगितले.

# देशोन्नती

## पालावरच्या शाळेला गटशिक्षण अधिकारी ससाणे यांनी दिली भेट



देशोन्नती वृत्तसंकलन...

■ शिक्षणापासून वंचित मुलांना मोफत शिकवून शिक्षणाच्या प्रवाहात आणणारे अवलिया शिक्षक शाम रावले यांचे मान्यवरांकडून कौतुक

**वसमत**■ शहरातील आसेगाव कॉर्नर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाच्या पाठीमागे एक वस्ती आहे या वस्तीवर अनेक जाती धर्मातील नागरिक पाल टाकून गेली अनेक वर्षे रोजमजुरी , काही कलाकार ,तर सापवाले, नंदी वाले, सर्प वाले इत्यादी लोक वस्ती करून रहातात. त्यांची मुलं शिक्षणापासून वंचित राहू नये ही प्रामाणिक भूमिका घेऊन वसमत शहरातील, तालुक्यातील सातेफळ या गावातील अनुदानित शाळेतील एक पूर्णवेळ ध्येयवेड्या श्यामराव रावले या शिक्षकांनी आपली नोकरी सांभाळून मागील काही महिन्यांपासून या पालावरील मुलांना शिक्षण देण्याचे ठरवून दररोज सायंकाळी हा अवलिया शिक्षक ३ ते ४ :३० मोफत शिकवणी घेत आहे , पालावरच त्यांनी ताटव्यात शाळा सुरू केली असून या झोपडीत जवळपास ३५ मुला मुलींना ते नियमित शिकवितात. या सर्व मुलांनी त्यांनी जीवन शिक्षण गौरव मासिकच्या वतीने वह्या, पेन्शील, उजळणी आदी साहित्य वाटप करण्यात आले आहे.

या अभ्यास वर्गाला ३० ऑक्टोबर रोजी वसमत पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी ससाणे, शिक्षण विस्तार अधिकारी तान्हाजीराव भोसले, समनव्यक अधिकारी पांडुरंग लांडगू , यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळा मुख्याध्यापक शहा यावेळी ३५ विद्यार्थी उपस्थित होते. त्यांना अध्यापणाचे काम श्यामराव रावले करीत होते. गटशिक्षणाधिकारी यांनी या वस्तीतील मुलांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांच्यासाठी विशेष शिक्षण योजना तयार करून ही मुलं मूळ शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न , या शाळेतील मुलं प्रत्यक्ष अधिकारी आल्याने खूपच आनंदी होती. या पालावरील मुलांना आपली नोकरी सांभाळून दररोज दुपारी ३ ते ४ या वेळेत ३० ऑक्टोबर पर्यंत मोफत शिकवणी देणारे शिक्षक श्यामराव रावले यांचे शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांकडून कौतुक केले जात आहे. (शहर प्रतिनिधी)

Deshonnati Edition
Oct 31, 2021 Page No. 3
Powered by : eReleGo.com


**⁕ मान्यवरांचे आभार:**


या उपक्रमासाठी मला मार्गदर्शन करणारे श्री ससाणे साहेब, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वसमत तसेच श्री तानाजीराव भोसले साहेब शिक्षण विस्तार अधिकारी वसमत, केंद्रप्रमुख श्री गुणाजीराव ढोरे सर, गट समन्वयक श्री लांडगू सर,शिक्षणदूत श्री नामदेवराव दळवी सर,माझ्या शाळेचे मुख्याध्यापक श्री सारंग सर,यशवंतराव प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री शहा सर, एम पी डब्ल्यू श्री दातार साहेब, वस्तीतील पालक श्री शेषराव नक्षलवाड श्री मारुती नक्कलवाड,सलीम पठाण या सर्वांचे मिळाले.आपण या उपक्रमाला केलेल्या सहकार्याबद्दल हार्दिक आभार.

### * संदर्भ सूची:

1) बालरक्षक ओळखपत्र

2) जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम आदेश दिनांक 9 जानेवारी 2017








**उपक्रमकर्ता बालरक्षक शिक्षक - श्यामराव नारायणराव रावले (माध्यमिक शिक्षक)**